महाराष्ट्र शासन

# जिल्हाधिकारी तथा जिल्हादंडाधिकारी, पालघर यांचे कार्यालय

## (आस्थापना शाखा)

**पार्श्वनाथ ९ इमारत, चिंतू पाडा रोड, बिडको नाका,**
**ता.पालघर, जिल्हा-पालघर**

**दुरध्वनी क्रमांक ०२५२५-२५३१११**
**Email ID : estcollectorpalghar@gmail.com**

---

क्र.महसूल/आस्था/क-१/टे-२/तलाठी ज्येष्ठता/एसआर-२१ /२०१९ दिनांक १७/०३/२०२०

---

**विषय :- दि.०१/०१/२०१९ रोजी कार्यरत असलेल्या तलाठी संवर्गातील कर्मचाऱ्यांची अंतरिम (प्रारुप) ज्येष्ठता यादी प्रसिध्द करणेबाबत.**

**ज्ञापन :-**

सामान्य प्रशासन विभागाकडील शासन निर्णय सामान्य प्रशासन विभाग क्र.एसआरव्ही-२०११/प्र.क्र.२८४/१२, दि.२१/१०/२०११ मधील तरतुदीनुसार पालघर जिल्ह्याच्या अधिनस्त क्षेत्रिय उपविभागीय आस्थापनेवरील स्थानापन्न तलाठी संवर्गातील कर्मचाऱ्यांची दिनांक ०१/०१/२०१९, रोजीची ज्येष्ठता दर्शविणारी प्रारुप ज्येष्ठता यादी प्रसिध्द करणेत येत आहे. सदर यादी प्रसिध्द झालेपासून १५ दिवसांच्या आत त्यावर हरकत/ सुचना दाखल करता येतील. सदर हरकती / सुचना कार्यालय प्रमुखांच्या अभिप्रायासह पाठवाव्यात. मुदतीनंतर आलेल्या हरकती/ सुचना विचारात घेतल्या जाणार नाही.

सर्व कार्यालय/ शाखा प्रमुख यांनी सदरची प्रारुप ज्येष्ठता यादी त्यांचे कार्यालयीन नोटीस बोर्डवर प्रसिध्द करुन, त्यांचे अधिपत्याखालील कार्यरत असलेल्या सर्व संबंधीत तलाठी कर्मचाऱ्यांच्या निदर्शनास आणावी.

(स्वाक्षरी/-)
**(डॉ.कैलास बा.शिंदे)**
**जिल्हाधिकारी पालघर**

**प्रत :-**

१. मा.विभागीय आयुक्त, कोकण विभाग, कोकण भवन, नवी मुंबई यांचे माहितीसाठी सविनय सादर.
२. अपर जिल्हाधिकारी पालघर, मुख्यालय जव्हार, यांना माहितीसाठी रवाना.
३. उपजिल्हाधिकारी भुसंपादन पालघर
४. उपजिल्हाधिकारी सुर्याप्रकल्प डहाणू पालघर
५. उप विभागीय अधिकारी डहाणू/पालघर/वसई/जव्हार/वाडा
६. तहसिलदार (सर्व)
७. जिल्हा सुचना विज्ञान अधिकारी, पालघर.

२/- सदर जेष्ठता यादी या कार्यालयाचे संकेत स्थळावर (www.collectorpalghar.nic.in) प्रसिध्द करावी. सदर यादी संकेतस्थळावर १५ दिवस ठेवण्यात यावी.

**(स्थळ प्रतीवर मा.जिल्हाधिकारी यांची स्वाक्षरी असे)**

**(उज्वला भगत)**
**तहसिलदार (महसूल)**
**जिल्हाधिकारी कार्यालय पालघर**